**सं.फौ.के.नं. २१९/२०२०**

**नि. क्र. ४६**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब**

नाव – शशिकांत मारुती जाधव,

वय– ४८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,

सध्या रा. लांजा, मुळ मुळ रा. चाफवली, सरोदेवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>सरकारतर्फे सरतपास सरकारी वकील श्रीम. वनकर यांचेतर्फे</u> –**

०१. आरोपी माझे नातलग आहेत. त्यामध्ये माझी बहीण, भाऊ आहेत. दि. ०२/०८/२०२० रोजी काहीही घडले नाही, मी लांजा येथे होतो. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नाही. माझ्या सांगण्यानुसार माझे टिपण नोंदवले नाही.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

०२. हे मला माहीती नाही की, दि. ०२/०८/२०२० रोजी सकाळी ०९.०० च्या सुमारास माझा पुतण्या व त्याची पत्नी त्यांच्या खोलीत मिळालेल्या डबीतील दागीने कोणाचे आहेत अशी विचारणा करत होते. हे मला माहीती नाही की, त्यावेळी माझी आई मालती जाधव, भाऊ रमाकांत जाधव, पल्लवी जाधव, वेदीका यादव त्यावेळी तीथे हजर होते. पल्लवी जाधव माझ्या भावाची पत्नी आहे. हे मला माहीती नाही की, माझी दुसरी बहीण स्वाती यादव ही देखील तीथे हजर होती. याची मला कल्पना नाही की, पल्लवी जाधवने, माझा पुतण्या आणि त्याच्या पत्नीला 'तुंम्ही चोर आहात' असे बोलुन शिवीगाळ करायला सुरुवात केली.

०३.  याची मला कल्पना नाही की, माझी बहीण वेदीका हीने सानवी हीला अर्वाच्च भाषेत शीवीगाळ केली व माझ्या भावाने देखील सानवी हीला घाणेरड्या शब्दांती शीवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, हा सर्व प्रकार माझ्या समक्ष घडला. सानवी जाधव माझ्या पुतण्याची बायको आहे. साक्षीदाराला त्याच्या टिपणातील रेखांकीत मजकुर वाचून दाखवला. हे मला माहीती नाही की, हा मजकुर माझ्या टिपणात कसा नमुद झाला. हे म्हणणे खरे नाही की, हे सर्व नातेवाईक असल्याने त्यांना वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीम. पी. सी. चव्हाण यांचेतर्फे नाकारला.–**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.04.15 18:31:28 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – १५/०४/२०२४** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**